**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री एस.आर कुलकर्णी यांचे मार्फत सुरुः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – रविंद्र गणपती पसरगे,

वय – ५१ वर्षे, व्यवसाय– शेती ,

राहणार – रा. तांबाळा, ता.निलंगा, जि. लातूर

मी आरोपी क्र.१ व २ यांना ओळखतो. आज न्यायालयात आरोपी क्र.१ व २ हजर आहेत. माझ्या वडीलांनी हलाप्पा सन्मुखप्पा पसरगे यांच्याकडुन सन १९७३ साली ७ एकर ३५ गुंठे मौजे तांबाळा गट नंबर २०४ ही जमीन मिळकत खरेदी केली होती. त्यावेळी पासून त्या मिळकतीवर आमचा ताबा आहे. ती जमीन स्वतः कसत आहे. घटना दि.२३/०८/२०१८ रोजी सकाळी १०.३० ते ११.०० च्या दरम्यान तांबाळा येथील गट नंबर २०४ यामध्ये घडली. त्यादिवशी सिमेंटचे खांब, पत्रे बैलगाडीमध्ये आणुन गट नंबर २०४ मध्ये पत्र्याचे शेड मारले. आमच्यामध्ये न्यायालयात दिवाणी दावा प्रलंबित होता. त्या दाव्याच्या कामी कोर्टाने मनाई हुकूम दिलेला असतांना देखील अनाधिकृतपणे पत्र्याचे शेड मारुन अतिक्रमण केले. त्यानंतर मी औराद शहाजनी पोलीस स्टेशनला अर्ज दिला. सदरचा अर्ज दाखवल्यास मी ओळखु शकतो. साक्षीदारास आता अर्ज दाखवण्यात आला. त्यावर त्यांची सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४२** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. जी.एस.दातार यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**

०२. मी शेती करतो. माझे शिक्षण हॉटिकल्चर अॅग्रीकल्चर डीग्री शिवाजी महाविद्यालय उमरगा येथून झालेले आहे. शेड आरोपीने स्वतः मारले. गुत्तेदार नव्हते. घटना घडलेला वार मला सांगता येणार नाही. गट नंबर २०४ चा जुना सर्वे नंबर १५२ होता. आमच्या गावामध्ये तुकडेबंदी सन १९८८ साली झाली. माझ्या वडीलांनी आरोपी क्र.१ वर दिवाणी दावा दाखल केला होता याबाबत मला माहीत नाही. आमच्यामध्ये दिवाणी केस सात वर्षे चालू होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी घटनास्थळी आधीपासूनच शेड होते व आरोपींचा ताबा होता. दिवाणी दावा मनाई हुकूमाचा होता. दत्तु पसरगे यांच्या सोबत देखील

आमचे शेताबाबत वाद चालू आहेत. तो वाद अद्यापही चालू आहे. माझ्या एकुण दोन केसेस चालू आहेत. आरोपींनी माझ्यावर केस केलेली आहे ती आजही चालू आहे. ही भांडणे सात वर्षापासून चालू आहेत.  हे म्हणणे खरे नाही की, मी दत्तु पसरगे व आरोपींवर खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या शेतात कधी आले नव्हते व त्यांनी कोणतेही शेड मारले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना न घडता मी आरोपींविरुध्द खोटी केस केलेली आहे. आरोपींनी माझ्या शेतावर ४० गुंठयाचे अतिक्रमण केले होते. अतिक्रमण केल्यानंतर जमीन आरोपींच्या ताब्यात एक दोन वर्षे होती. त्यानंतर दोन वर्षांनी मी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तुकडेबंदीमध्ये जमीन आरोपींच्या ताब्यात गेलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणतेही अतिक्रमण केलेले नाही व कसलेही शेड मारलेले नाही.

**उलटतपास पुर्ण** **श्रवणोत्तर स्वीकृत.**

**फेरतपास नाही.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2025.07.25 16:49:13 +0530

(**श्रीमती.के.पी.गाडे**)

दिनांक–२५/०७/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,
निलंगा